# MT EDUCARE LTD.

**QUEST- I (Semi Prelim - I)**
**2017 - 18**

**पाठ -** १ ते ६, **पद्य -** १ ते ४ **स्थूलवाचन -** १, २
**व्याकरण, -** शब्दाच्या जाती, वाक्यप्रचार, काळ, प्रयोग, वाक्यरुपांतर, लिंग, वचन, समानार्थी, विरुद्धार्थी

---

**CBSE - X** **Set - A**

**Roll No.** ☐☐☐☐☐☐☐ **Code No. 52/1**

**Series LRH/1**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| • | खण्ड : क | : | १. अपठित गद्य उतारा<br>२. अपठित गद्य उतारा | 13 गुण |
| • | खण्ड : ख | : | रचनात्मक लेखन<br>१. निबंध लेखन<br>२. संवाद लेखन<br>३. पत्र लेखन | 13 गुण |
| • | खण्ड : ग | : | व्याकरण | 18 गुण |
| • | खण्ड : घ | : | साहित्य : गद्य, पद्य, स्थूलवाचन | 36 गुण |

***Time allowed* :** 3 hours ***Maximum Marks* :** 80

## MARATHI

**General Instructions :**

(१) चार खंड आहेत - क, ख, ग आणि घ.

(२) सूचनेप्रमाणे सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

(३) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवावेत.

## खंड 'क'

**Q.1. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

परिसर, निसर्ग यांप्रमाणे प्राण्यांशीही गाढ स्नेह जमू शकतो. कधी कधी माणसांच्या मैत्रीपेक्षा प्राण्यांची मैत्री अधिक उत्कट असते. धन्यासाठी जीव टाकणारे कुत्रे, घोडे यांची असंख्य उदाहरणे आढळून येतील. रोज घरात येणारे मांजर चार दिवस दिसले नाही, तर चुकल्यासारखे होऊन जाते. अंगणात नियमाने येणाऱ्या, दाणे टिपणाऱ्या चिमण्या नकळत आपल्याला लळा लावतात. चार दिवस गमतीने परगावी गेलो, तर घरातल्या टेबलखुर्च्यांसारख्या आणि कपाट-कॅलेंडरसारख्या निर्जीव गोष्टींची देखील एकसारखी आठवण होत राहते. पुस्तके सारखी टेबलावर पडून असतात. महिना महिना आपण त्यांना हात देखील लावत नाही; पण ती डोळ्यांसमोर हवी असतात. त्यांतले एखादे दिसेनासे झाले, तर आपण बेचैन होऊन जातो. या साऱ्या वेगवेगळ्या सोबतीच. त्यांचे महत्त्व तसे जाणवत नाही. त्यांची आवश्यकता मात्र फार मोठी असते.

चांगली मैत्री म्हणजे चांगली सोबत. चांगला सहवास. मानसिक आणि भावनिक संवाद साधण्याचे एक चांगले स्थळ. या सोबतीची आपल्याला एवढी ओढ का असावी ? मला वाटते, चांगली सोबत हे आपल्या व्यक्तित्वाचेच एक ॅहिेंग्दह - एक वाढलेले रूप आहे. आपल्यामधल्या अनेक उणिवा तिथे परिपूर्ण झालेल्या असतात. आपली अपुरी राहिलेली स्वप्ने त्या ठिकाणी साकार झालेली दिसतात.

**प्रश्न :**

१. 'सोबत' या शब्दाचे लिंग ओळखा. **1**

अ) पुल्लिंग    ब) स्त्रीलिंग

क) नपुंसक लिंग    ड) यांपैकी नाही

२. वरील उताऱ्यास योग्य शीर्षक द्या ? **1**

३. अ गटातील शब्दांच्या ब गटातील अर्थाशी जोड्या लावा. **2**

| अ | ब |
|---|---|
| (१) परिसर | (अ) कमतरता |
| (२) उणिवा | (ब) वातावरण |
| | (क) सभोवतालची जागा |

४. वरील उताऱ्यात कशाचे महत्त्व सांगितले आहे ? कसे ? **3**

**Q.2. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

जगातील साऱ्या कर्तबगार महिलांना अभिमान वाटावा अशी एक घटना ३० मे १९९४ रोजी घडली. अनेक अडचणींवर मात करून स्वत:च्या कर्तृत्वाने एअरबस ३२० ची आशिया खंडातील पहिली महिला कॅप्टन बनली. पुण्याच्या देशमुखांच्या घरात जन्माला आलेल्या या सौदामिनीने आपले नाव सार्थ केले. तिच्या आकांक्षापुढे हे उंच आकाशही ठेंगणे वाटू लागले.

आपण मोठेपणी वैमानिक व्हायचे हे स्वप्न सौदामिनीने बालपणापासूनच उराशी बाळगले होते. त्यावेळी तिच्या या महत्त्वाकांक्षेची दखल कोणीच घेतली नव्हती. पण या बाबतीत मात्र तिच्या वडिलांनी तिला प्रोत्साहन दिले होते.

मुंबईच्या जय हिंद महाविद्यालयातून ती पदवीधर झाली. पुढील दोन वर्षे तिने कायद्याचा अभ्यास केला. वयाच्या १७ व्या वर्षापासून तिने 'बॉम्बे फ्लाईंग क्लब' मध्ये नाव नोंदवले होते. तेथे वैमानिकाचे प्रशिक्षण घेऊन तिने वैमानिक परवाना मिळवला. परंतु खाजगी वैमानिक परवाना मिळवण्यासाठी येणारा खर्च तिला परवडणारा नव्हता म्हणून तिने बँकेत नोकरी केली. मात्र त्या नोकरीत ती संतुष्ट नव्हती. मग तिने 'इंडियन विमेन्स पायलट असोसिएशन' चे सभासदत्व स्वीकारले. त्याच काळात अमेरिकेतील नाईण्टीनाईन असोसिएशन महिला सदस्य मुंबईत आल्या होत्या. त्यांच्याशी सौदामिनीची मैत्री जडली. त्यांनी विमान-उड्डाण अनुभव घेण्यासंबंधीची सौदामिनीची अडचण जाणून घेतली व तिला त्यासाठी अमेरिकेत येण्याचे आमंत्रण दिले. तेव्हा सौदामिनीचा आनंद गगनात मावेनासा झाला. आठ महिन्यांची बिनपगारी रजा घेऊन व बँकेचे कर्ज काढून ती अमेरिकेत गेली. या आठ महिन्यांच्या कालावधीत तिने एकूण ३०० तासांचा हवाई उड्डाणाचा अनुभव मिळवला व यासंबंधातले निरनिराळे पाच परवाने मिळवून ती भारतात परतली.

**प्रश्न :**

१. सौदामिनी देशमुख यांनी किती वर्षे कायद्याचा अभ्यास केला ? **1**

१. पाच    २. दोन    ३. आठ

२. 'आकाश ठेंगणे वाटणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करून वाक्य बनवा. **1**

३. सौदामिनीची मैत्री कुणाशी जडली ? त्यांनी सौदामिनी यांना कशी मदत केली ? **2**

४. आठ महिन्यांची सुट्टी घेऊन सौदामिनी कुठे गेल्या ? तिथे जाऊन त्यांनी काय केले ? **2**

## खंड 'ख'

**Q.3. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा. (कोणतेही एक)** **8**

१. **मी पंतप्रधान झालो तर ....**

**मुद्दे :-** कल्पना कशी सुचली ? - तुम्ही काय कराल ? - देशातील भ्रष्टाचार, गरिबी दूर - सर्वांना शिक्षण - मानवता प्रस्थापित - सकारात्मक विचार - कल्पना योग्य - शेवट

२. **श्रमाचे महत्त्व**

**मुद्दे :-** श्रम म्हणजे काय ? - श्रमाचे महत्त्व - श्रमाने मिळणारे आयुष्यातील यश - मानवाला श्रमाची आवश्यकता - आळस माणसाचा शत्रू - श्रमाने मात - श्रम कधीही वाया जात नाहीत - आधी मेहनत मग फळ - शेवट

३. **फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त**

**मुद्दे :-** निर्मिती- त्यावेळी भोगाव्या लागणाऱ्या यातना - निर्मितीचा आनंद - त्यानंतरचा प्रवास - आजची स्थिती - अपेक्षा - शेवट.

**Q.4. खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

संगिता/ सुजित काळे, विद्यार्थी प्रतिनिधी, ज्ञानदीप विद्यालय, भांडूप (पूर्व) येथून शाळेसमारील रस्ता नादुरुस्त असल्या कारणाने विभागीय अधिकारी, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना पत्र लिहिते/ लिहितो. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

समीर देशमुख/ समिरा देशमुख, सेनापती मार्ग, पुणे हा/ ही व्यवस्थापक, मुलुंड स्पोर्टस्, मुलुंड, मुंबई -११, यांच्याकडे खेळाच्या साहित्याची मागणी करतो/ करते.या पत्राचा नमुना तयार करा. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

**खालील विषयावर संवाद लेखन करा.**

रक्तदान शिबिर आयोजित करायचे आहे त्यासाठी सोसायटीमध्ये चालू असलेला संवाद लिहा.

**खंड 'ग'**

**Q.5. अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा.** **5**

१. मी परवा तुझ्याकडे येईन. (क्रियाविशेषण अव्यय ओळखा.)
२. मी तिकडे गेलो पण तो आलाच नाही. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)
३. शाब्बास ! उत्तम यश मिळवलेस. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)
४. त्यांना पन्हं नेऊन दे. (प्रश्नार्थी करा.)
५. ही चित्रं फारच रंगीबेरंगी आहेत. (उदगारार्थी करा.)

**Q.5. आ) प्रयोग बदला.** **3**

१. विजापूरच्या आदिलशहाने दरगाह उभारला. (कर्तरी प्रयोग करा.)
२. बाबूजी घराची वाट धरतात. (कर्मणी प्रयोग करा.)
३. बाबूजी मुलांना काही कमी पडू देत नाही. (भावे प्रयोग करा.)

**Q.5. इ) काळ ओळखा.** **2**

१. मला आईस्क्रीम आवडत असे.
२. गावात विहीर आहे.

**Q.5. ई) लेखन नियमांनुसार वाक्य शुदध करून लिहा.** **2**

१. त्यांची कवीता तेरावी, चौदावीची मुलं अभासत होती.
२. चैतरगौरीच्या हळदिकुंकवाचे प्रमाण कमी झालेलं दिसतं.

**Q.5. उ) लिंग बदला.** **1**

१. कवयित्री २. मांजर

**Q.5. ऊ) वचन बदला.** **1**

१. वर्तमानपत्र २. हत्ती

**Q.5. ए) समानार्थी शब्द लिहा.** **1**

१. आकाश २. पाय

**Q.5. ऐ) विरूद्धार्थी शब्द लिहा.** **1**

१. पहिला २. विश्वास

**Q.5. ओ) पुढील वाक्यात कंसातील योग्य वाक्प्रचार वापरुन वाक्य पुन्हा लिहा.** **2**
**(मन भरून येणे, उत्कंठा लागणे, भान हरपणे)**

१. दहावीच्या निकालाची विद्यार्थ्यांना खूप आतुरता लागली होती.
२. स्वामीजींना निरोप देताना रविवर्मा सद्‌गदित झाले.

**खंड 'घ'**

**Q.6. अ) खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : (कोणतेही एक)** **4**

१. ''आम्ही कधी आपण होऊन परस्थांच्या घरी अनाहूतपणे जात नाही''.
२. एकांतवासातही माणूस एकटा थोडाच असतो ?
३. भारतीय आई काय किंवा अमेरिकन आई काय, मुलांचे कौतुक दोघींनाही सारखेच प्रिय असते की !

**Q.6. आ) योग्य पर्याय शोधून विधान पूर्ण करा.** **1**

१. .......... हे उत्पादक, शारीरिक परिश्रमाचे प्रतीक मानले जात असे.
(कंदील, सूतकताई, पाटीपेन्सिल, झाडू)

**Q.7. अ) खालील प्रश्नांची उत्तरे सुमारे ५०-६० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन)** **8**

१. 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे' असे कृष्णाबाई का म्हणतात ?
२. आनंदोत्सवात साजरे करताना कोणत्या मर्यादा पाळणे आवश्यक आहे ?
३. निसर्गाशी संवाद साधायला हवा, असे लेखक का म्हणतो ?
४. स्वामी विवेकानंद व राजा रविवर्मा यांच्या भेटीस 'अपूर्व भेट' असे का म्हटले आहे ?

**Q.7. आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **2**

१. मित्रांशी बोलताना आपण कोणते विषय टाळतो ?
२. लेखिकेस ऋतुबदलाचा आनंद कोणाबरोबर एकत्रितपणे साजरा करावासा वाटतो ?

**Q.8. अ) खालील पद्यपंक्तींचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा : (कोणतेही एक)** **4**

१. कृपा करी पंढरीनाथा । दीनानाथ तूं समर्था ।।
अपराध करी क्षमा । तुझा न कळे महिमा ।।

२. नाही माझ्या घरट्यात, चांदरातीचे मोहोळ
बालरवि-किरणांची नाचे इथे प्रभावळ !

३. अवघा निरसला शीण । देखतां संतचरण ।।
आजि दिवाळी दसरा । सेना म्हणे आले घरा ।।

**Q.8. आ) खाली दिलेल्या पद्यपंक्तीतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरून ती पद्यपंक्ती पुन्हा लिहा :** **1**

१. असे .......... श्रमांचा पुजारी! (मुरारी, विश्वकर्मा, श्रीहरी, रवि वर्मा)

**Q.9. अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा : (कोणतेही दोन)** **8**

१. कवीला कोणता प्रलय अपेक्षित आहे? का?
२. संत सोयराबाई यांनी संसाराची तुलना मृगजळाबरोबर कशी केली आहे?
३. कवीला आपल्या घरट्यात कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात?
४. संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे?

**Q.9. आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **2**

१. कवितेतील घरट्यात कोणती प्रभावळ नाचते?
२. संत नरहरी सोनार यांनी दीनानाथ कोणास म्हटले आहे?

**Q.10. अ) खालील पठित उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** **4**

तुम्हा दोघांनाही घरच्यांकडून भरभरून प्रेम मिळण्याची, लाड करवून घेण्याची आणि सदैव तुमची काळजी घेणारे कोणी तरी आहे या विश्वासाची सवय आहे. पण जसे तुम्ही दोघे मोठे व्हाल, तसे तुमच्या लक्षात येईल की जग फार वेगळ्या प्रकारच्या माणसांनी, वृत्तींनी भरलेले आहे; आणि लहानपणापासून तुम्हांला ज्या सौजन्यपूर्ण वातावरणाची सवय आहे, तसे वातावरण जगात नेहमीच नसते.

हिंसा, अभिलाषा, मत्सर हे जीवनाचाच भाग आहेत, हे सध्या तुमच्या शाळकरी आयुष्यातच तुम्हांला दुर्दैवाने शिकायला मिळते आहे. मोठे व्हाल तेव्हा तुम्हांला याच शत्रूंना जिंकायचे आहे. तेव्हा प्रत्येक दिवसाची सुरुवात प्रार्थनेने करा.

तुम्ही जेव्हा स्नान करता तेव्हा आपणासाठी पर्वतांमधून खोलखोल दऱ्याखोऱ्यांतून व महान नद्यांतून येणाऱ्या आशीर्वादस्वरूप पाण्याचे स्मरण ठेवा. कोणतेही जीवन पाण्याविना अशक्य आहे. तेव्हा पाण्याबाबत खबरदारी घ्या, त्याचा एक थेंबही वाया जाणार नाही असे पहा.

**प्रश्न :**

१. 'रम्य ते बालपण' यावर तुमचे मत लिहा.
२. तुमच्या आजीने तुमच्यावर केलेल्या संस्कारांची आठ ते दहा ओळीत माहिती लिहा.

**Q.10. आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** **2**

१. 'चलेजाव' आंदोलनात महाराष्ट्रातील कोणता जिल्हा आघाडीवर होता ?
२. भारतात जन्मलेले पहिले पुस्तक कोणते?

***Best of Luck*** 👍